1. The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Standalone Financial Results are available on the website of the Stock Exchange, www.bseindia.com and the Company's website, www.simplex-group.com.
2. The above results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meeting held on 20th January,2023.
3. The above financial results have been prepared in accordance with the Companies (Indian Accounting Standards) Rules, 2015 (Ind AS) as prescribed under Section 133 of the Companies Act, 2013 and other recognised accounting practices and policies to the extent applicable.

For Simplex Papers Limited
Sd/-
Shekhar R Singh
Director
DIN- 03357281

Place: Mumbai
Dated: 20th January, 2023

YASH TRADING AND FINANCE LIMITED

(CIN: L51900MH1985PLC036794)
Registered office: Bagri Niwas, 53/55, N. M. Path, Mumbai – 400 002
Corporate Office: 1207/A, P.J.Towers, Dalal Street, Fort, Mumbai – 400 001
Tel No. +91-22-2272 0000
Email id. yashtradingandfinancelimited@gmail.com
Website: www.yashtradingfinance.com

Statement of Standalone Un-audited Results for the Quarter ended 31-December-2022

(Rupees in Lakhs except Earnings per share data)

Particulars	Quarter ending 31-Dec-2022	Year to date Figures 31-Dec-2022	Corresponding 3 months ended in the previous year 31-Dec-2021
Total income from operations	-	-	-
Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and / or Extraordinary items)	(2.51)	(5.44)	(2.26)
Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and / or Extraordinary items)	(2.51)	(5.44)	(2.26)
Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and / or Extraordinary items)	(2.51)	(5.44)	(2.26)
Total Comprehensive Income for the period [Comprising Profit /(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	(2.51)	(5.44)	(2.26)
Equity Share Capital	24.50	24.50	24.50
Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year)	Rs. -78.12 lakh and Rs.-69.64 lakh as on 31-Mar-2022 and 31-Mar-2021 respectively		
Earnings Per Share (of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) -			
Basic :	(1.02)	(2.22)	(0.92)
Diluted:	(1.02)	(2.22)	(0.92)

Notes:

1. The above financial results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meeting held on 20th January, 2023 and a Limited Review of the same has been carried out by the Statutory Auditors.
2. Previous period figures have been rearranged wherever necessary.
3. The company has only one segment.
4. These results have been prepared in accordance with SEBI Listing Regulations and SEBI circulars issued from time to time.
5. The above is an extract of the detailed format of the Quarterly financial results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The Full quarterly financial results are available on the Company's website i.e. www.yashtradingfinance.com and BSE Ltd. Website i.e. www.bseindia.com

For and behalf of the Board of Directors of
Yash Trading and Finance Limited
Sd/-
Sadiq Patel
Director
DIN: 06911684

Place: Mumbai
Date : 20.01.2023

WR PROVIDES ADDITIONAL STOPPAGE TO MUMBAI CENTRAL - GANDHINAGAR CAPITAL VANDE BHARAT EXPRESS AT BORIVALI W.E.F 23.01.23

Also, Revision In Timings of Above Trains at Few Stations

20901 Mumbai Central – Gandhinagar Capital Vande Bharat Express		Station Name	20902 Gandhinagar Capital – Mumbai Central Vande Bharat Express	
Existing Timing	Revised Timing		Existing Timing	Revised Timing
06.10 (D)	06.00 (D)	Mumbai Central	20.15 (A)	20:25 Hrs.
- -	**06.23 (A) 06.25 (D)**	**Borivali**	- -	**19.32 (A) 19.34 (D)**
08.00 (A) 08.02 (D)	07.56 (A) 07.58 (D)	Vapi	18.13 (A) 18.15 (D)	No change in timings

Train No. 20901/20902 Mumbai Central – Gandhinagar Capital Vande Bharat Express will run on **'all days except Wednesday w.e.f 30th May, 2023'.**

WESTERN RAILWAY
www.wr.indianrailways.gov.in
Like us on: facebook.com/WesternRly
Follow us on: twitter.com/WesternRly

Azadi Ka Amrit Mahotsav

PLEASE CARRY ORIGINAL ID PROOF FOR ALL RESERVED TICKETS

E-AUCTION SALE NOTICE

(Under regulation 32 & 33 of IBBI (Liquidation Process) Regulations, 2016

HEMA ENGINEERING INDUSTRIES LIMITED (In Liquidation) [HEIL]

Liquidator of HEIL hereby invites, Eligible Bidder(s) for participation in E-auction Sale of Assets of HEIL, listed herein, on **'As is Where is, Whatever There is and Without Recourse' basis** as per the auction schedule stated herein and as per the detailed terms, conditions & process listed in Bid Document which can be downloaded from https://www.bankeauctions.com and www.hemaengineering.com

Lot No.	Lot Name	Location	Reserve Price (Rs. Crore)	EMD (Rs. Crore)
1.	Vallam Land* (admeasuring 4.65 Acres)	G-119, SIPCOT Industrial Park, Vallam, Distt, Kancheepuram, TN	6.61	0.66
2.	P&M including inventories- (HEIL Unit-VIII)	Plot No.4, Industrial Park-2, Salempur Mehdood, Haridwar – 249403 (Uttarakhand

तिबेटच्या न्यिंगचीमध्ये हिमस्खलन १३ जणांचा मृत्यू! बचावकार्य सुरूच

■ बीजिंग

तिबेट येथील दक्षिण-पश्चिम क्षेत्रातील न्यिंगची येथे हिमस्खलन झाले आहे. या घटनेत आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या हिमस्खलनामध्ये हरवलेल्या नागरिकांचा शोध सुरू आहे. चीन सरकारने मदतकार्यासाठी येथे विशेष पथक पाठवले आहे.

मेनलिंग काउंटीमधील पाई गावात व मेडोग काउंटी येथील डोक्सोंग येथे मंगळवारी रात्री ८ च्या सुमारास हे हिमस्खलन सुरू झाले. यामध्ये नागरिक व वाहने अडकल्याची माहिती आहे. मात्र किती नागरिक अडकले आहेत याची अधिकृत माहिती अद्याप मिळालेली नाही. स्थानिक अधिकाऱ्यांनी १३१ नागरिक व २८ वाहनांना घटनास्थळी पाठवले आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. स्थानिक प्रशासन अर्लट मोडवर आहे. तत्काळ मदतकार्य सुरु केले आहे. समुद्रसपाटीपासून ३ हजार ४० मीटर उंचीवर न्यिंगची आहे. या शहराला तिबेटचे स्वित्झर्लंड असे संबोधले जाते. सुरुवातीला ८ जणांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात होते. मात्र मृतांचा आकडा वाढून तो आता १३ झाला आहे.

नेटफ्लिक्स सहसंस्थापकाचा सीईओ पदाचा राजीनामा

विदेश वृत्त

■ लॉस गाटोस

नेटफ्लिक्सचे सह संस्थापक रिड हेस्टिंग्स यांनी सीईओ पदावरून राजीनामा दिला. त्यांच्या राजीनाम्यामुळे दोन दशकांचे त्यांचे प्रदीर्घ नेतृत्व संपुष्टात आले आहे. नेटफ्लिक्सचे कार्यकारी अध्यक्ष सारंडोस आणि मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रेग पीटर्स यांच्याकडे हेस्टिंग्स यांनी राजीनामा सुपूर्द केला. कंपनी तात्काळ प्रभावाने त्यांचा राजीनामा मंजूर करेल.

हेस्टिंग्स यांनी आपला राजीनामा देताना म्हटले, आम्ही गेल्या काही काळात कोविड सारख्या आव्हानाचा सामना केला. याचा आमच्या व्यवसायावर खूप मोठा परिणाम झाला आहे. बोर्ड आणि मी असे मानतो की, राजीनामा देण्याची हीच योग्य वेळ आहे. माझ्या उत्तराधिकाऱ्यांच्या हाती पुढील कमान सोपवायला हवी.

हेस्टिंग्स यांनी कंपनीला रेंट बाय मेल 'डीव्हीडी' सेवेमुळे अधिक मनोरंजन बनवले. राजीनामा देताना ते म्हणाले की, हीच योग्य वेळ आहे. त्यांच्यासह दीर्घकाळापासून सोबत असलेले त्यांचे सहयोगी आणि सह-सीईओ टेड सारंडोस आणि कंपनीचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर ग्रेग पीटर्स यांच्या हाती नेटफ्लिक्सची कमान सोपविणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

नेटफ्लिक्सचे शेअर गेल्यावर्षी ३८ टक्के इतके खाली आले होते. नंतर यामध्ये ६.१ टक्क्यांनी वाद झाली. मात्र काही अहवालानुसार २०२२ च्या पहिल्या सहा महिन्यात नेटफ्लिक्स प्रचंड दबावात आले होते. तर वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत नेटफ्लिक्सने बंपर कमाई केली. गेल्या वर्षी चौथ्या तिमाहीत नेटफ्लिक्सने ७.६६ दशलक्ष ग्राहक जोडले.

नव्या पेन्शन योजनेला विरोध फ्रान्समध्ये व्यापक आंदोलन

१० हजारहून अधिक पोलीस तैनात केले

■ पॅरिस

फ्रान्समध्ये निवृत्ती वयाच्या प्रकरणात जनतेमध्ये प्रचंड आक्रोश दिसत आहे. सरकारच्या नवीन पेन्शन सुधारणा योजनेविरोधात सुरू असलेला गोंधळ थांबण्याचे नाव घेईना. देशातील नवीन पेन्शन योजनेच्या निषेधार्थ सुरू झालेली निदर्शने सुरूच आहेत. सरकारच्या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी काल गुरुवारी तर लाखो लोकांनी रस्त्यावर उतरून व्यापक मोर्चा काढला. यावेळी देशातील काही भागात आंदोलकांची पोलिसांशी झटापट झाल्याचे चित्र समोर आले. या प्रचंड निदर्शनादरम्यान अनेक संघटनांनी संप जाहीर करून अनेक सरकारी सेवा खंडित केल्या. उग्र निदर्शनांमुळे फ्रान्सच्या सार्वजनिक वाहतूक सेवेवर दूरगामी परिणाम झाला. यादरम्यान पोलिसांनी सौम्य बळाचा वापर केला त्यामुळे संतप्त झालेल्या लोकांनी पोलिस आणि पॅरिस प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी करत आपला आक्रोश दर्शविला. दरम्यान, जर हे निवृत्ती वयवाढी बाबतचे विधेयक मंजूर झाले तर फ्रान्समधील सरकारी नोकऱ्यांमधील निवृत्तीचे वय ६२ वरून ६४ होईल, असे त्यांचे म्हणणे आहे. जनतेने या नवीन सुधारणा पूर्णपणे नाकारल्या आहेत. ६८ टक्के लोकांचा त्याला विरोध आहे. मीडियामध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, पॅरिस पोलीस आता अशा आंदोलकांच्या गर्दीला तोंड देण्यासाठी नवीन उपाययोजना करत आहेत.

१५ वर्षांपेक्षा जुनी असणारी सरकारी वाहने भंगारात जाणार

■ मुंबई

प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. या गंभीर समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने मोटार वाहन कायद्यात सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. या कायद्यानुसार १५ वर्षांहून अधिक जुन्या सर्व शासकीय वाहनांची नोंदणी रद्द करण्यात येणार आहे. तसेच यात नोंदणीमध्ये नूतनीकरण केलेल्या गाड्यांचाही समावेश असेल. या सर्व गाड्या नोंदणीकृत भंगार केंद्रावर नष्ट केल्या जाणार असून हा नवा नियम १ एप्रिलपासून लागू होणार आहे. या नवीन नियमाच्या अंमलबजावणीनंतर, १५ वर्षांपेक्षा जुनी केंद्र सरकारची वाहने, सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेश सरकारची वाहने, महामंडळांची वाहने, सार्वजनिक उपक्रम, राज्य परिवहन वाहने, सार्वजनिक उपक्रम आणि सरकारी अनुदानित संस्थांची वाहने हद्दपार होणार आहेत. या वाहनांमध्ये लष्कराच्या कोणत्याही वाहनाचा समावेश केला जाणार नाही.

एलआयसी कंपनीची 'जीवन आझाद' योजना

■ मुंबई

एलआयसीने नवी 'जीवन आझाद' योजना सुरू केली आहे. या पॉलिसीअंतर्गत विमाधारक व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला आर्थिक मदत मिळते. विमाधारक जिवंत असताना पॉलिसी मॅच्युअर झाली तर संपूर्ण देय रक्कम एकाच वेळी दिली जाईल.

पॉलिसी परिपक्व होण्यापूर्वी विमाधारकाचा मृत्यू झाल्यास मृत्युपर्यंत दिलेल्या प्रीमियमच्या १०५ टक्क्यांपेक्षा जास्त मृत्यू लाभ मिळेल. ही पॉलिसी २ लाख ते ५ लाख रुपयांपर्यंत काढता येईल. पॉलिसी १५ ते २० वर्षे काळासाठी असेल. प्रीमियमची रक्कम दर सहा महिन्यांनी, एक वर्षाने अथवा तीन महिन्यांनी भरता येईल. योजना ऑनलाईन किंवा ऑफलाईन विकत घेता येईल.

चक्क गावचा रस्ताच चोरीला गेला शोधून देणाऱ्यास ५ लाखांचे बक्षीस

■ मालेगाव

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात एक अजब गजब चोरीचा प्रकार घडला आहे. तालुक्यातील टोकडे गावात कागदोपत्री रस्ता तयार करण्यात आला होता.मात्र, हा रस्ताच चोरीला गेल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते विठोबा द्यानदान यांनी केली होती.तसेच हा रस्ता शोधून देणाऱ्या ५ लाख बक्षिस देण्याची घोषणाही द्यानदान यांनी केली आहे.

विशेष गंमतीची गोष्ट अशी की तक्रारीवरून कार्यकारी अभियंता संजय नारखेडे आणि त्यांच्या पथकाने दिवसभर फिरून हा बेपत्ता झालेला रस्ता शोधला, मात्र तो सापडण्यात अपयश आले. त्यामुळे आता हे प्रकरण सीबीआयकडे सोपवावे अशी मागणी आता सामाजिक कार्यकर्ते द्यानदान हे करणार आहेत. द्यानद्यान यांनी गावातून चोरी गेलेला रस्ता शोधून देणाऱ्यास यापूर्वी एक लाख रुपयांनंतर दोन लाख रुपये व आता पाच लाखांचे बक्षीसही जाहीर केले आहे. आठ महिन्यांपासून अनेक पथकांकडून या रस्त्याचा शोध सुरू आहे. परंतु रस्त्याचा ठावठिकाणा लागत नसल्याने प्रशासनही हतबल झाले आहे. मागील वर्षी मार्च महिन्यात तयार झालेला १८ लाख रुपये किमतीचा 'चोरीला' गेलेल्या रस्त्याचा अजूनपर्यंत शोध न लागल्याने गावकऱ्यांची चिंता वाढली आहे. याबाबत द्यानद्यान यांनी मालेगाव तालुका पोलिस ठाण्यात चोरीची रीतसर तक्रार ही दाखल केली. प्रशासनाकडून या अजब चोरी प्रकरणाचा वेळोवेळी शोध घेतला जात आहे. परंतु, हाती काहीच लागत नसल्याने रस्ता गेला कुठे? याचा पेच वाढत चालला आहे. या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे देण्याची मागणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याकडे करणार आहोत, असे द्यानद्यान यांनी सांगितले.

मनसुख हत्या आणि स्फोटकेप्रकरणी प्रदीप शर्मांना न्यायालयाचा दिलासा

■ मुंबई

मुंबई सत्र न्यायालयाच्या विशेष एनआयए न्यायालयाने मनसुख हिरेन आणि उद्योगपती अंबानी यांच्या निवासस्थानाबाहेर सापडलेल्या स्फोटके प्रकरणी माजी पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा यांना दिलासा देणारा निर्णय दिला आहे. शर्मा यांच्या विरोधात केलेली वैद्यकीय समिती स्थापन करण्याची मागणी न्यायालयाने फेटाळली आहे. या प्रकरणात पुढील सुनावणी ७ फेब्रुवारी रोजी होणार आहे. प्रदीप शर्मा यांच्यावर गेल्या अनेक महिन्यांपासून पुण्याच्या ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र एनआयएने मुंबई सत्र न्यायालयातील विशेष एनआयए कोर्टात अर्ज करून प्रदीप शर्मा यांच्या प्रकृतीची तपासणीकरीता विशेष वैद्यकीय समिती स्थापन करण्याची मागणी एनआयएने केली होती. मात्र ही मागणी मुंबई सत्र न्यायालयाने फेटाळून लावली आहे.

पेन्शनर संघटनांचा मोर्चाचा इशारा

मुंबई- एमटीएनएल आणि बीएसएनएलच्या निवृत्त कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना केंद्र सरकारच्या ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे पेन्शन रिविजन/ पुनर्विचार करण्यासाठी पेन्शनर संघटनांनी संयुक्तपणे डॉट दूरसंचार विभागाच्या मनमानी कारभाराविरुध्द आंदोलनं करण्यात आली. दूरसंचार विभाग बीएसएनएल आणि एमटीएनएल निवृत्तांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे पेन्शन पुनर्विचार करावा या प्रस्तावाचा निर्णय घेण्यात दिरंगाई करीत असून, जाणूनबुजून टाळाटाळ करीत आहे. म्हणून दूरसंचार विभागाच्या विरोधात १७ व १८ जानेवारी दोन दिवस आंदोलन केली आहेत.

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील मालक/सदस्य सौ. हर्षा धिरज कोठारी (उर्फ हर्षा धिरज कोठारी आणि उर्फ हर्षदा धिरज कोठारी) यांच्याशी याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेल्या "चर्चगेट मेंशन" या इमारतीच्या १ ल्या मजल्यावरील सदनिका क्र. ९ ("सदनिका") व त्यासह चर्चगेट को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, ज्याच्या त्या सदस्य आहेत, त्याद्वारे पारित प्रमाणपत्र क्र. ३७ धारण केलेल्या समभागामध्ये समाविष्ट ५ (पाच) पूर्णतः भरणा केलेल्या समभागांमधील ("समभाग") त्यांचे हक्क आणि लाभार्थी हितसंबंध खरेदी करण्याकरिता बोलणी करीत आहेत.

सदनिका, समभाग यामध्ये करारनामा (मौखिक किंवा लेखी), हमी, व्यवस्था, विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, अभिहस्तांतरण, नियुक्ती, प्रभार, गहाणवट, भेट, न्यास, भाडेपट्टी, मासिक भाडेकरू, लीव्ह ॲण्ड लायसन्स, भागिदारी, संयुक्त उपक्रम, वारसा, धारणाधिकार, वहिवाट, ताबा, वहिवाटीचा हक्क, कोणतेही प्रतिकूल अधिकार, शीर्षक, हितसंबंध किंवा कोणत्याही स्वरुपाचा दावा, विवाद, खटला, हुकूम, आदेश, प्रतिबंधात्मक करार, मनाई आदेश, जप्ती, संपादन, मागणी, किंवा इतर कोणत्याही मार्गे कोणत्याही प्रकारचा हक्क, शीर्षक, हितसंबंध किंवा दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्ती किंवा व्यक्तींनी त्याबाबत निम्नस्वाक्षरीकार यांना लेखी स्वरुपात सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत निम्नस्वाक्षरीकारांद्वारे योग्य लेखी पोचपावतीच्या बदल्यात हाती वितरण किंवा रजिस्टर्स पोस्ट ए.डी. द्वारे फक्त निम्नस्वाक्षरीकारांच्या पत्त्यावर म्हणजेच खोली क्र. २९, २ रा मजला, बॉम्बे म्यूच्युअल चेंबर्स, हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथे कळवावे. असे न केल्यास, असा कोणताही दावा सोडून दिला आणि/किंवा गुंडाळून ठेवला असे समजण्यात येईल आणि त्यानंतर वरील उल्लेखित पक्षकारांच्या पर्यायावर व्यवहार पूर्ण केला जाईल, अशा परिस्थितीत बोलणी अंतिम करण्यात येतील.

मालमत्तेची अनुसूची

मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामधील आणि तसेच मुंबईच्या नोंदणीकरण आणि उप-नोंदणीकरण जिल्ह्यामधील ए- रोड, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२० येथे स्थित, फोर्ट विभाग, मुंबईचा कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. १६९५ धारण केलेल्या प्लॉट क्र. १७ वर बांधलेल्या "चर्चगेट मेंशन" या इमारतीच्या १ ल्या मजल्यावरील सर्व सदनिका क्र. ९, मोजमाप अदमासे ६२२ चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ तसेच चर्चगेट को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.च्या सदस्यतेमधील मालक/सदस्य यांचे सर्व हक्क व त्यासह चर्चगेट को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.च्या भाग प्रमाणपत्र क्र. ३७ द्वारे दर्शविले जाणारे डिस्टिंक्टीव्ह क्र. ३६ ते ४० धारण केलेल्या रु. २५०/- (रुपये दोनशे पन्नास मात्र) एकूण मूल्य असलेले, रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) प्रत्येकी दर्शनी मूल्य असलेले ५ (पाच) पूर्णतः भरणा केलेले समभाग.

दिनांक २० जानेवारी, २०२३

श्री. प्रकाश डी. गोरिया
वकील, उच्च न्यायालय मुंबई
खोली क्र. २९, २ रा मजला, बॉम्बे म्यूच्युअल चेंबर्स, हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४००००१. दूरध्वनी - २२६४ २०२४, मोबाईल ९८२०१९५३७५

अनुसूची।
फॉर्म ए
जाहीर उद्घोषणा
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (ऐच्छिक परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१७ च्या विनियमन १४ अन्वये)
इंडस्ट्रिकल्स ऑनलाईन प्रायव्हेट लिमिटेडच्या कर्जबारांचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधित तपशील		
१.	कॉर्पोरेट व्यक्तीचे नाव	इंडस्ट्रिकल्स ऑनलाईन प्रायव्हेट लिमिटेड
२.	कॉर्पोरेट व्यक्तीच्या स्थापनेचा दिनांक	०९.१०.२०१५
३.	प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट व्यक्तीची स्थापना/नोंदणीकरण झाले	कंपनी निबंधक, मुंबई कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय
४.	कॉर्पोरेट व्यक्तीचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक	U74900MH2015PTC269046
५.	कॉर्पोरेट व्यक्तीच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता	गाळा क्र ५, आबीअरर इंड. इस्टेट, ११४ बीडीडी चाळ, महिंद्रा टॉवर जवळ, जी. एम. भोसले मार्ग, वरळी, मुंबई शहर महा. ४०००१८.
६.	कॉर्पोरेट व्यक्तीची दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक	१७ जानेवारी, २०२३
७.	परिसमापकाचे नाव, पत्ता, ईमेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि नोंदणीकरण क्रमांक	श्री. विघ्नेश्वर भट आयबीबीआयकडील नोंदणीकृत पत्ता आणि पत्रव्यवहाराचा पत्ता: क्र. २०२, ए ब्लॉक श्री लक्ष्मी निवास अपार्टमेन्ट्स, विल्सन गार्डन १३ वा क्रॉस, विल्सन मनोर अपार्टमेन्टजवळ, बंगलुरू, कर्नाटका ५६००२७. ई-मेल: bhatvighnesh@gmail.com दूर. : +९१ ९५९०२ ५२८५१ सदस्यता क्र.: IP-N01190 नोंद. क्र.: IBBI/IPA-002/IP-N01190/2021-2022/13985
८.	दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक	दि. १६ फेब्रुवारी, २०२३

याद्वारे सूचना देण्यात येते की, मे. इंडस्ट्रिकल्स ऑनलाईन प्रायव्हेट लिमिटेड (कंपनी) ने दि. १७ जानेवारी, २०२३ रोजी ऐच्छिक परिसमापन सुरू केले आहे. कंपनीच्या भागधारकांना याद्वारे त्यांच्या दाव्यांचे पुरावे दि. १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापक यांच्याकडे नोंद क्र. ७ मध्ये नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे. वित्तीय कर्जदार यांनी दाव्याबाबतचे त्यांचे दाव्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व कर्जदार त्यांचे दाव्यांचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/- श्री. विघ्नेश्वर भट
दिवाळखोरी व्यवसायिक
दिनांक : १८.०१.२०२३ नोंद. क्र.: IBBI/IPA-002/IP-N01190/2021-2022/13985
ठिकाण : बंगलुरू ई-मेल आयडी: bhatvighnesh@gmail.com

रेणुका देवीच्या चरणी ९५ लाखांची रक्कम अर्पण

बेळगाव- सौंदत्ती तेथील श्री रेणुका देवीच्या मंदिराची दानपेटी उघडण्यात आली आहे. यंदा श्री रेणुका देवीच्या भाविकांनी मंदिराच्या दानपेटीत ९५ लाखांहून अधिक रक्कम देवी चरणी अर्पण केली आहे.

जाहीर सूचना

माझे पक्षकार **श्री. विवेकानंद दत्तात्रय खेडेकर** यांच्या वतीने सर्वसाधारण जनतेस सूचित करण्यात येत आहे की, रुम नं. बी-८, चारकोप अहिंसा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, प्लॉट नं. ८६२, रोड नं. आर.एस.सी-१४, सेक्टर क्र. ८, "आर" वॉर्ड, चारकोप, कांदिवली (प), मुंबई - ४०००६७ ही रुम श्री. विवेकानंद दत्तात्रय खेडेकर यांना मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या द्वारे वितरीत झाली आहे.
माझे पक्षकार श्री. विवेकानंद दत्तात्रय खेडेकर यांच्याकडून सदर रुमचे वाटपपत्र/ऑफर लेटर, स्वीकृतीपत्र, सुरुवातीचे रक्कम भरल्याची पावती, सदर गृहनिर्माण संस्थेचा सदस्य होण्याबाबत म्हाडाचे पत्र व इतर म्हाडाचे मुळ कागदपत्रे गहाळ व हरवले आहेत.
जर कोणा व्यक्तीस सदर रुम किंवा भागावर विक्री, हस्तांतरण करारनामा, तारण, अदलाबदल, वारसाहक्क, भाडेपट्टा, मालकी हक्क, वहिवाट, कायदेशिर हक्क, परवाना, बक्षीस, मृत्यूपत्र, न्यास, परिरक्षा ताबा किंवा बोजा किंवा अन्य जप्ती स्वरुपात कोणताही दावा आक्षेप, अधिकार किंवा हित असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात कागदोपत्री पुराव्यांसह माझ्या खाली नमुद केलेल्या पत्त्यावर त्यांच्या सदर मालमत्तेचे अधिकाराबाबत आणि सदर मालमत्तांचे हस्तांतरणाबाबत आक्षेप/दाव्याचे पृष्ठयर्थ दस्तावेज व इतर पुराव्यांच्या प्रतींसह सदर सूचना प्रकाशन तारखेपासून १५ दिवसांत कळवावे अन्यथा सदर रुम व सदर शेअर्स हे सर्व अधिभार किंवा दबित्यापासून अशा दाव्यांच्या संदर्भाशिवाय मुक्त आहे असे घोषित केले जाईल आणि तद्नंतर ते त्याग किंवा स्थगित केले आहेत असे समजले जाईल.

यांचेतर्फे
श्री. विवेकानंद दत्तात्रय खेडेकर
संपर्क - ॲड. श्रध्दा धमाले
मोबाईल : ९९३०२७७८४६
ईमेल- dhamale.shraddha1@gmail.com
ठिकाण: मुंबई
दिनांक : २१/०१/२०२३

मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

दुरध्वनी क्र. ०२२-२४३०१०११ ई-मेलः rreegsmhada@gmail.com

ई-निविदा क्र.१२(२०२२-२३)

निम्नस्वाक्षरीकार, मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळ यांचे वतीने विहित अटी व शर्तीनुसार मुंबई बेटावरील ग-दक्षिण विभागांतर्गत खालील उपकरप्राप्त/पुनर्रचित इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीसाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

मा. उपाध्यक्ष/प्रा.याच्या मान्यतेने पत्रक क्र. सीई-१/ए/७२/१८ दि. ०८/०२/२०१८ रोजीच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करून निविदा भरावे.

अ. क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम (रुपये)	इसारा रक्कम (१ टक्का) (रुपये)	सुरक्षा अनामत (१ टक्के) (रुपये) (५०% प्रथम व ५०% देयकातून)	निविदा शुल्क (रुपये)	मुदत	नोंदणी
१	२	३	४	५	६	७	८
१)	कार्यकारी अभियंता ग-दक्षिण विभागातील १४-१६ खरास बिल्डिंग, ना. म. जोशी मार्ग, या इमारतीची दुरुस्ती करणे. (तिसरी सुचना)	२५००५८१/-	२५००१/-	५१०००/-	५९०/-	१८ महिने	वर्ग - ५अ व वरील
२)	ग-दक्षिण विभागांतील इमारत क्र. ३३, क्लिफ्लेट बिल्डिंग, पोचखानवाला रोड, वरळी, ग-दक्षिण विभाग, मुंबई या इमारतीचे दुरुस्ती काम करणे (दुसरी सुचना)	३६२४८३६/-	३६२४८/-	७३०००/-	५९०/-	१८ महिने	वर्ग - ५अ व वरील

अ. क्र.	प्रक्रिया	दिनांक व वेळ
१)	प्रकाशन दिनांक	२३/०१/२०२३, सकाळी १०.०० वाजल्यापासून
२)	निविदा विक्री सुरुवात	२३/०१/२०२३, सकाळी १०.०५ वाजल्यापासून
३)	देकार सादर सुरुवात	२३/०१/२०२३, सकाळी १०.०५ वाजल्यापासून
४)	निविदा विक्री शेवट	३०/०१/२०२३, सकाळी ११.०० वाजेपर्यंत
५)	देकार सादर शेवट	३०/०१/२०२३, दुपारी ३.३० वाजेपर्यंत
६)	तांत्रिक देकार उघडण्याची वेळ	३१/०१/२०२३ दुपारी ३.३० वाजल्यानंतर
७)	आर्थिक देकार उघडण्याची वेळ	०१/०२/२०२३, दुपारी ३.३० वाजल्यानंतर

१. संपूर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाईन (ई-टेंडरींग) दोन लिफाफे पद्धतीची असेल. निविदेसंबंधी अधिसूचना, अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाची वेबसाईट **https://mahatenders.gov.in** यावर प्रसिद्ध होईल.
२. निविदा संबंधित दस्ताऐवज वेबसाईट **http://mahatenders.gov.in** यावर पाहून डाऊनलोड /अपलोड करता येईल. तसेच निविदा फॉर्म दिनांक २३/०१/२०२३ (सकाळी १०.०० वाजेपासून) ते दिनांक ३०/०१/२०२३ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) वेबसाईट वरून डाऊनलोड करता येईल.
३. निविदे सोबतवरील प्रमाणे शुल्क व इसारा रक्कम पुढील पद्धतीने भरावी लागेल. **SBI Net Banking or Other Net Banking** द्वारे पेमेंट भरावे.
४. तांत्रिक निविदा दिनांक ३१/०१/२०२३ रोजी दुपारी ३.३० वाजता कार्यकारी अभियंता, ग-दक्षिण विभाग, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, ५ वा मजला, मुक्तांगण शाळेच्या बाजुला, विश्वराजा दर्शन इमारतीच्या मागे, प्रभादेवी (प), मुंबई ४०००१३. यांचे दालनात वेबसाईट **http://mahatenders.gov.in** वर उघडण्यात येईल.
५. निविदाकाराने निविदा सादर करताना अपलोड केलेली सर्व मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी तांत्रिक निविदा उघडण्याच्या वेळी सादर करावीत.
६. निविदाकाराने सादर केलेली माहिती व स्कॅन केलेल्या प्रती .pdf फॉरमेटमध्ये तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावी.
७. परफॉर्मन्स सेक्युरिटी
   अ. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारानी निविदाधीन किमतीचा १% एवढ्या रक्कमेचा धनाकर्ष परफॉर्मन्स सेक्युरिटी म्हणून (सुरक्षा अनामत रक्कम वगळून) तिसरा बंद लिफाफामध्ये प्रमाणित प्रतवारी प्रमाणपत्रासह सादर करावयाचा आहे. सदर प्रमाणपत्र डी. डी. व सॉल्व्हन्सी ह्यांना लागू आहे.
   ब. निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा कमी दराने असेल तर देकार १०% पेक्षा जेवढ्या रक्कमेचा वरील बाब (अ) प्रमाणे येणाऱ्या रक्कमेसह एकत्रित धनाकर्ष तिसऱ्या बंद लिफाफामध्ये सादर करावे. (उदा. १४% कमी दरासाठी परफॉर्मन्स सिक्युरीटी = (१४% - १०%) + १% = ५%)
   क. धनाकर्ष उपलब्ध करून देणे बाबीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.
      १) धनाकर्ष हे मुख्य लेखाधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई यांचे नावे असावा.
      २) धनाकर्ष हे राष्ट्रीयकृत अथवा शेड्युल बँकेकडून काढलेला असावा.
      ३) धनाकर्ष हे निविदा भरण्याचा दिनांकानंतर किमान ३ महिने वैध असावा.
८. निविदाकारासाठी जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.
   १) जीएसटीच्या नियमावलीचे पुरविण्यात आलेल्या स्वरुपाप्रमाणे देयकामध्ये वाढ करण्यात येईल.
   २) निविदाकाराने सादर केलेली माहिती व स्कॅन केलेल्या प्रती. RAR फॉरमॅटमध्ये तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावी.
९. निम्नस्वाक्षरीकार हे कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा किंवा रद्द करण्याचा हक्क राखून ठेवत आहेत.
१०. निविदेसंबंधी कागदपत्रे व ऑनलाईन निविदा सादर करणेबाबत आवश्यक ते मार्गदर्शन मिळण्याकरिता वेबसाईट **http:// mahatenders.gov.in** वर संपर्क साधावा. प्राधिकरणाच्या / शासनाच्या वेळोवेळी जारी केलेल्या परिपत्रक तसेच मार्गदर्शक सूचनांनुसार निविदा उघडण्याची कार्यवाही करण्यात येईल.

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

सही/-
कार्यकारी अभियंता,
ग-दक्षिण विभाग, मुं.इ.दु.व पु. मंडळ

CPRO/A/56

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग उत्तर रत्नागिरी ४१५६१२
Website- www.mahapwd.gov.in / e-mail- northratnagiri.ee@mahapwd.gov.in

निविदा सूचना क्र. ६३ सन २०२२-२३ ई-निविदा (ऑनलाईन)

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) रत्नागिरी (दूरध्वनी क्र. २२३५०५) महाराष्ट्र शासनाच्या सा.बां. खात्याकडे योग्य त्या कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता **ब-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन मागवित आहेत.

अ. क्र.	कामाचे नांव	अंदाजित किंमत ₹
१	रत्नागिरी जिल्ह्यातील आणि तालुक्यातील जिल्हा शासकीय रुग्णालय रत्नागिरी येथील १०० खाटांचे रुग्णालयाची विविक्षीत दुरुस्ती करणे.	१,६१,१२,९९६/-
२	रत्नागिरी जिल्ह्यातील आणि तालुक्यातील जिल्हा शासकीय रुग्णालय रत्नागिरी येथील ५२ खाटांचा कक्ष औषधालय तसेच १० खाटांचे रुग्णालय वॉर्ड (टप्पा-५) ची विशेष दुरुस्ती करणे.	१,२४,२०,८९९/-

टिप :- या निविदेमध्ये एकूण **०२** कामांचा समावेश असून निविदा ऑनलाईन घेण्याचा (डाऊनलोड) व सादर करण्याचा (अपलोड) कालावधी दिनांक **२४/०१/२०२३ ते ०६/०२/२०२३** पर्यंत असून या निविदा उघडण्याचा दिनांक **०८/०२/२०२३** असा आहे. या निविदेमधील संपूर्ण माहिती संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. **www.mahatender.gov.in.**

जा.क्र. एनआरडी/एबी/टीसी/६३/२५६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
उत्तर रत्नागिरी (सा.बां.) विभाग
रत्नागिरी दिनांक १८/०१/२०२३
आरओसी-२०२२-२३/क्र-५/सी ५४५४

सही/-
(अमोल अ. ओटवणेकर)
कार्यकारी अभियंता
उत्तर रत्नागिरी (सा.बां.) विभाग
रत्नागिरी

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, (सा.बां.वि.) यांचे कार्यालय
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
फोन- २२०१६९७५
फॅक्स- २२०१६९७३

ई -निविदा सूचना क्र.७० सन २०२२-२०२३ (फेरनिविदा)

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दूरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष